# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/०९/२०२६ ( शनिवार )**

---

**नागपूर ग्रामीण पोलिसांनी गंभीर गुन्हे करून वर्चस्व निर्माण करणाऱ्या तसेच दहशत पसरविणाऱ्या ५ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (MCOCA) अन्वये कारवाई केली.**

**पोलीस स्टेशन बुट्टीबोरी** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात बुट्टीबोरी पोलीसांनी **गंभीर गुन्हे करून वर्चस्व निर्माण करणाऱ्या तसेच दहशत पसरविणाऱ्या आरोपीतांच्या** टोळीचा प्रमुख तसेच सदस्य अशा एकुण ५ आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम अन्वये कारवाई केली आहे. सदर टोळीचा प्रमुख आरोपी नामे क्रं **१) दिक्षांत धनराज पाटील, वय २६ वर्ष रा. वार्ड क्र.०५ व्हिडीओ चौक, बुटिबोरी ता/जि. नागपूर, आणि टोळी सदस्य २) अमित उर्फ नाना अरुण भोयर, वय २६ वर्ष, रा. जुनी वस्ती प्रभाग क्र. १०, बुटिबोरी ता/जि. नागपूर ३) देवसिंग मुक्तारसिंग भट्टी, वय २३ वर्ष, रा. एस.के.जि. क्वार्टर बुटिबोरी, ता/जि. नागपूर ४) आशिष उर्फ मुथ्थु संतोष कराळे, वय २६ वर्ष, रा. फ्रेन्ड्स कॉलनी, बुटिबोरी ता/जि. नागपूर व पाहीजे आरोपी क्र. ५) कुणाल रामेश्वर पुरके, वय २८ वर्ष, रा. बुटिबोरी हे** आहेत.

पोलीस स्टेशन बोरी येथे अप क्र. ७७७/२०२६ कलम ३१०(२), ३११, १२७(२), ३५१(२), ३५२ भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल आहे. फिर्यादी ओम राजु बसेने हा दिनांक २६/०८/२०२६ रोजी अपना पंजाबी ढाबा रुईखैरी येथे जेवण करुन मोटार सायकलने बुटिबोरी ते सातगाव मार्गे घरी जात असतांना अंदाजे ०४/०० वाजता सुमारास सातगाव रोडवरील आई लॉन समोरील रोडवर अंधारात आरोपी दिक्षांत पाटील, नाना उर्फ अमित भोयर, कुणाल पुरके, देवभटटी, मुथ्थु उर्फ आशिष कराळे, व आणखी एक व्यक्ती असे माझे मोटार सायकलचे आडवे होवुन चाकुचा धाक दाखवुन फिर्यादीचे दोन्ही हाथ दोरीने बांधुन शिवागाळी करुन जिवानिशी मारण्याची धमकी देवुन फिर्यादीचे खिशातुन ४,५००/—रु व जुना वापरता आय फोन ८ कंपनीचा मोबाईल फोन अंदाजे कि.२०,०००/—.रु, ऑनलाईन २,०००/—रु व जुनी वापरती हिरो होन्डा कंपनीची स्पेल्डर मोटार सायकल

क्रमांक डभ ३१ ठस ९१७० अंदाजे किमती २५,०००/—रु असा एकुण ५१,५००/—रु चा माल बळजबरीने हिसकावुन घेवुन हाथबुक्याने गालागालावर चापट व लोखंडी रॉडने पायावर मारहाण केल्याचे फिर्यादीचे तोडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे गुन्हा दाखल करून तपासात घेतला.

सदर गुन्हयाचे तपासादरम्यान नमुद गुन्हयात कलम ३१०(२) भान्यासं दिनांक १५/०९/२०२६ रोजी नमुद गुन्हयात कलम वाढ करण्यात आली आहे. आरोपीकडुन गुन्हयात वापरलेला चाकु, लोखंडी रॉड, दोरी फिर्यादीचा मोबाईल फोन, आरोपीतांनी गुन्हा करतेवेळी वापर केलेली मो.सा. जप्त करण्यात आले. नमुद आरोपी क्र. ०१ ते ०४ यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

पोलीसांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास केला असता असे निदर्शनास आले की, सदर गुन्हा हा संघटीतरित्या केलेला असुन नमुद संघटित गुन्हेगारी टोळीचा प्रमुख दिक्षांत धनराज पाटील वय २६ वर्ष रा. वार्ड क्र.०५ व्हिडीओ चौक, बुटिबोरी ता/जि. नागपूर हा आहे. तो स्वत: संघटीतपणे तसेच नवनविन टोळी सदस्यांना हाताशी धरुन परीसरात दहशत निर्माण व्हावी या गुन्हेगारी उद्देशाने **जिवाने मारण्याची धमकी देवुन दरोडा घालणे, गैरकायद्याची मंडळी जमवुन खुन करणे, साथीदारांसह जबरी चोरी करणे, साथीदारांसह प्राणघातक हत्याराने गंभीर दुखापत करणे तसेच अश्लील शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी देणे** यासारखे गंभीर गुन्हे वारंवार करीत असतो. अभिलेखावर त्याचे विरुध्द तसेच त्याचे साथिदारा विरुध्द अनेक गुन्हे नोंदं आहेत. सदर टोळीप्रमुख हा नागपुर ग्रामीण आणि शहर परीसरात दहशत निर्माण करून वर्चस्व प्रस्थापीत करण्याचे हेतुने टोळी सदस्यांना हाताशी धरून विविध प्रकारचे गंभीर गुन्हे करतो. **तरी त्याने त्याचे इतर सदस्य साथीदारांसोबत नागपुर ग्रामीण हद्दीमध्ये सदरचा गंभीर गुन्हा करून वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. टोळी प्रमुख व टोळी सदस्याला प्रभावी प्रतिबंधात्मक कार्यवाही करून सुध्दा त्यांनी गुन्हे करणे सुरूच ठेवले आहे. तसेच नमुद आरोपींचा गुन्हेगारी अभिलेख बघता त्यांच्या विरूध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये कारवाई करण्यात आली.**

**बोरी पोलीसांनी नमुद ५ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये प्रस्ताव तयार करून मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्फतीने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे कडे सादर केला असता मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांच्या कार्यालयाकडुन सदर प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याने सदर गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे.**



दिक्षांत धनराज पाटील



अमित उर्फ नाना अरुण भोयर



देवसिंग मुक्तारसिंग भट्टी



आशिष उर्फ मुथ्थु संतोष कराळे



कुणाल रामेश्वर पुरके

# पोलीस स्टेशन पारशिवनी यांनी सराईत गुन्हेगार कार्तिक वेलस्वामी येसने याला एमपीडीए कायदयाअंतर्गत केले स्थानबध्द

**पोलीस स्टेशन पारशिवनी :–** पोलीस स्टेशन पारशिवनीच्या अभिलेखावरील सराईत आरोपी नामे कार्तिक वेलस्वामी येसने, वय २४ वर्ष, रा. न्यु गजानन मंदीर जवळ, चिचोली खापरखेडा, ता. सावनेर, जि. नागपूर याचे विरूध्द नागपूर ग्रामीण अंतर्गत पोलीस स्टेशन पारशिवनी येथे अवैध वाळु उत्खनन, वाळु चोरी व वाळुतस्करी संबंधाने अनेक गुन्हे नोंद असुन नमुद आरोपी हा असे गंभीर गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. पोलीसांनी आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. तरीसुध्दा आरोपीने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली असुन तो समाजासाठी धोकादायक ठरत असुन त्याचे बद्दल सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे.

**आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने तसेच नमुद आरोपी समाजासाठी धोकादायक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली पारशिवनी पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कारवाई करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी, जि. नागपुर यांनी सराईत गुन्हेगार कार्तिक वेलस्वामी येसने, वय २४ वर्ष, रा. न्यु गजानन मंदीर जवळ, चिचोली खापरखेडा, ता. सावनेर, जि. नागपूर याचे विरूध्द एमपीडीए कायद्यान्वये स्थानबध्दतेचा आदेश काढला असुन पारशिवनी पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन दिनांक १८/०९/२०२६ रोजी त्याला ताब्यात घेवुन जिल्हा जिल्हा मध्यवर्ती कारागृह वर्धा येथे स्थानबध्द करण्यात आले आहे.**



कार्तिक वेलस्वामी येसने

# पोलीस स्टेशन बोरी यांनी सराईत गुन्हेगार
# मोहम्मद अकलीम मोहम्मद असलम शेख याला एमपीडीए कायदयाअंतर्गत केले स्थानबध्द

**पोलीस स्टेशन बोरी :–** पोलीस स्टेशन बोरीच्या अभिलेखावरील सराईत आरोपी नामे मोहम्मद अकलीम मोहम्मद असलम शेख, वय ३७ वर्ष, रा. वार्ड नं. ३, रूईखैरी, बोरी, ता. जि. नागपूर याचे विरूध्द नागपूर ग्रामीण अंतर्गत पोलीस स्टेशन बोरी येथे शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द (साथीदांरासह चोरी, विनयभंग, पेट्रोल व डिझेल सारख्या अत्यावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणे) संबंधाने अनेक गुन्हे नोंद असुन नमुद आरोपी हा असे गंभीर गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. पोलीसांनी आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. तरीसुध्दा आरोपीने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली असुन तो समाजासाठी धोकादायक ठरत असुन त्याचे बद्दल सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे.

**आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने तसेच नमुद आरोपी समाजासाठी धोकादायक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली बोरी पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कारवाई करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी, जि. नागपुर यांनी सराईत गुन्हेगार मोहम्मद अकलीम मोहम्मद असलम शेख, वय ३७ वर्ष, रा. वार्ड नं. ३, रूईखैरी, बोरी, ता. जि. नागपूर याचे विरूध्द एमपीडीए कायद्यान्वये स्थानबध्दतेचा आदेश काढला असुन बोरी पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन दिनांक १८/०९/२०२६ रोजी त्याला ताब्यात घेवुन जिल्हा जिल्हा मध्यवर्ती कारागृह चंदपूर येथे स्थानबध्द करण्यात आले आहे.**



**मोहम्मद अकलीम मोहम्मद असलम शेख**

# नागपूर ग्रामीण पोलीस दलातर्फे आगामी सण–उत्सवांच्या पार्श्वभूमीवर ध्वनी प्रदूषणाबाबत जारी करण्यात आली अधिसूचना

मा. श्री, हर्ष पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांनी आगामी काळात नागपूर ग्रामीण जिल्हा हद्दीत विविध धर्मियांचे सण, उत्सव, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम तसेच मिरवणुका आयोजित केल्या जाणार आहेत. या काळात मोठ्या आवाजातील ध्वनीक्षेपक, लाऊडस्पिकर, डॉल्बी आणि मल्टिपेअर साऊंड सिस्टिममुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी व रुग्णांच्या आरोग्याला गंभीर बाधा पोहोचू शकते. सार्वजनिक शांतता भंग होऊ नये आणि कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडू नये, यासाठी पोलीस विभागातर्फे नागपूर ग्रामीण जिल्ह्यात ध्वनी प्रदूषणाबाबत कडक निर्बंध लादले आहेत.

**सदर आदेश दिनांक २० सप्टेंबर २०२३ चे मध्यरात्री ००:०१ वाजल्यापासून ते ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी चे रात्री २४:०० वाजेपर्यंत नागपूर ग्रामीण जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत लागू राहतील.**

नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील सर्व नागरिकांना खालील अटी व नियमांचे पालन करणे बंधनकारक राहिल.

१) परवानगी आणि मर्यादारू ध्वनीक्षेपक किंवा लाऊडस्पिकर वापरण्याची परवानगी मिळाल्यानंतरही संबंधीत आयोजकांनी The Noise Pollution (Regulation and control) Rules, २००० मध्ये निर्धारित केलेल्या ध्वनि मर्यादेचे काटेकोर पणे पालन करणे बंधनकारक राहील.

२) रात्री २२.०० वा. ते सकाळी ०६.०० वा या कालावधीत जिल्हादंडाधिकाऱ्यांनी विहित केलेले विशेष दिवस वगळता, ध्वनीक्षेपक, लाऊडस्पिकर आणि ॲम्प्लीफायर वापरण्यास पूर्णपणे सक्त मनाई आहे.

- **परिसरनिहाय डेसिबल (dB) मर्यादा :–**

अ) औदयागिक क्षेत्रात आवाजाची तिव्रता :– दिवसा ७५ dB(A) व रात्री ७० dB(A),

ब) वाणिज्य क्षेत्रात आवाजाची तिव्रता :– दिवसा ६५ dB(A) व रात्री ५५ dB(A),

क) निवासी क्षेत्रात आवाजाची तिव्रता :– दिवसा ५५ dB(A) व रात्री ४५ dB(A),

ड) शांतता क्षेत्र (Silence Zone) तिव्रता :– ५० dB(A) व रात्री ४० dB(A),

यापमाणे आवाजाची मर्यादा असणे बंधनकारक असेल. तसेच The Noise Pollution (Regulation and control) Rules, २००० मधील तरतूदी व शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांच्या अधीन राहून निर्बंध राहतील.

३) कुठल्याही मिरवणूक व इतर कार्यकमाकरीता ध्वनीक्षेपक/साउंड सिस्टिम वापरण्याकरीता पुढील निर्देश देण्यात येत आहे.

अ) दोन टॉप व दोन मिड्स वापरण्यास परवानगी राहील. (वरील मुददा क ०२ मध्ये नमुद निर्देश/अटींचे अधीन राहून ही परवानगी राहील)

ब) बास सिस्टिम वापरण्यास पुर्णता मनाई राहील.

क) प्लाइझमा साउंड सिस्टिम वारण्यास पुर्णत मनाई राहील.

ड) प्रेशर मिड सिस्टिम वापरण्यास पुर्णत मनाई राहील.

इ) लेझर लाईट व उच्च तिव्रतेचा झकमगणारा लाईट्स वापरण्याची पुर्णता मनाई राहील.

४) रुग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये व शासनाने अधिसूचीत केलेल्या इतर Silence Zone परिसरात लागू असलेल्या ध्वनीमर्यादा व निर्बंधांचे काटेकोर पालन करावे.

५) परवानगीच्या अटींचे उल्लंघन किंवा ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांविरूध्द पर्यावरण सरंक्षण कायदा १९८६ आणि ध्वनी प्रदुषण (विनियमण व नियंत्रण) नियम २०००, च्या तरतुदी नूसार तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ कलम १३६, ७० अन्वये कारवाई करण्यात येईल.

सदर आदेशाचे भंग करणाऱ्यांविरूध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम १३४, १३६ अन्वये तसेच इतर विहित प्रचलित कायद्यान्वये कार्यवाहीस पात्र राहतील तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ कलम ७० अन्वये ध्वनीक्षेपकाचे साहित्य जप्त करण्यात येईल.

नागपूर ग्रामीण पोलीसांव्दारे सर्व नागरिक, गणेशोत्सव उत्सव मंडळांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना शांतता राखण्यासाठी व नियमांचे पालन करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येते.

## जनावरे चोरीचा गुन्हा उघड, ०१ आरोपी अटक,
## १ लाख ७० हजारांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जनावरे चोरीचा गुन्हा उघड करून १ आरोपीस अटक केले आहे.**

दिनांक १८/०९/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे पोलीस स्टेशन कन्हान अप. क्र. ६५८/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं. चे गुन्हयाचे समांतर तपासात सदर गुन्ह्यातील आरोपी **संजोग लीलाधर होले, वय २३ वर्ष, रा. टिमकी नागपूर ह्. मु. चणकापूर, खापरखेडा** यानी **सदर गुन्हा केल्याचे निष्पन्न केले.** आरोपीस ताब्यात घेवुन त्याचेकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता आरोपीने त्याचे साथीदारासह पोलीस स्टेशन कन्हान परिसरात बकऱ्या चोरीचा गुन्हा केल्याची माहीती दिली. सदर गुन्हयातील **आरोपी याला अटक करण्यात आली आहे.**

पोलीसांनी आरोपीकडुन १) बकऱ्या विकून प्राप्त केलेले नगदी २०,०००/— रुपये २) गुन्हयात वापरलेली हुंडाई आय ट्वेंटी क्रमांक एम एच —०४/डी वाय—१३३५ किंमती १,५०,०००/— रुपये असा एकूण किंमती १,७०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन सदर गुन्हा उघडकीस आणला आहे.




## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ४ लाख ८० हजार रूपयांचा मूद्देमाल जप्त केळवद पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन केळवद :— दिनांक १८/०९/२०२६ रोजी केळवद पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखुची अवैधरित्या वाहतुक केली जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात केळवद पोलीसांनी बिहाडा फाटा पांढुर्णा सावनेर रोडवर नाकाबंदी करत कारवाई केली असता **आरोपी फैजल सैफउल्ला पठाण, वय २४ वर्ष, रा. टेका नाका दर्गा जवळ, नागपुर जि. नागपुर** हा मारूती सूजूकी डिझायर वाहन क्र. एम एच—४९/सी एस—८७०६ सह मिळुन आला. पंचासमक्ष वाहनाची झडती घेतली असता त्याचेजवळ महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आली. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण वजन ३०.१९१ किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती ६०,२६०/— रूपये, मारूती सूजूकी डिझायर वाहन क्र. एम एच—४९/सी एस—८७०६ किंमती ४,००,०००/—रूपये, ०१ मोबाईल किंमती २०,०००/—रूपये असा एकुण ४,८०,२६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उत्पादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने वाहतूक केली आहे. **आरोपी फैजल सैफउल्ला पठाण, वय २४ वर्ष, रा. टेका नाका दर्गा जवळ, नागपुर जि. नागपुर** यांचेविरूद्ध पोस्टे केळवद येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर आरोपीला अटक करण्यात आली आहे.

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०२ गुन्हे नोंद, ११ लाख ९३ हजार रूपयांचा मूद्देमाल जप्त नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात दिनांक १५/०९/२०२६ व दिनांक १६/०९/२०२६ रोजी नरखेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखुची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या इसमांविरूद्ध नरखेड पोलीसांनी कारवाई करत ०२ गुन्हे नोंद करून एकुण ११,९३,४६०/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**कारवाई क्र. १):—** दिनांक १५/०९/२०२६ रोजी नरखेड पोलीसांनी मोवाड चौकी समोर, मोवाड ते नरखेड मेन रोडवर नाकाबंदी करत कारवाई केली असता **आरोपी १) नवनीत सुभाषरावजी ऐकोतखाणे, वय २२ वर्ष, रा. आयमा कॉलनी, आष्टी, ता. आष्टी जि. वर्धा २) धिरज रंगराव लेवटे, वय ३२ वर्ष, रा. सातरगाव, ता. तिवसा, जि. अमरावती** हे चारचाकी वाहन क्र. एम एच—२७/डी यु—१५०७ सह मिळुन आले. पंचासमक्ष वाहनाची झडती घेतली असता त्याचेजवळ महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आली. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण वजन ६३.४ किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती ९०,५५०/— रूपये, चारचाकी वाहन क्र. एम एच—२७/डी यु—१५०७ किंमती ५,००,०००/—रूपये असा एकुण ५,९०,५५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्र. २):—** दिनांक १६/०९/२०२६ रोजी नरखेड पोलीसांनी तहसिल चौक नरखेड येथे नाकाबंदी करत कारवाई केली असता **आरोपी सतिश मोहन गुप्ता, वय २५ वर्ष, रा. ह. मु. प्लॉट नं. ५४, प्रियदर्शिनी नगर, एन आय टी गार्डन, त्रिमुर्ती नगर नागपूर** हा चारचाकी झायलो वाहन क्र. एम एच—४०/के आर—१४६६ सह मिळुन आला. पंचासमक्ष वाहनाची झडती घेतली असता त्याचेजवळ महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु

मिळुन आली. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण वजन ४७६.४६ किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती ३,०२,९१०/— रूपये, चारचाकी वाहन किंमती ३,००,०००/—रूपये असा एकुण ३,०२,९१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

दोन्ही कारवाईतील एकुण **वजन ५३९.८६ किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती ३,९३,४६०/— रूपये, ०२ चारचाकी वाहने असा एकुण ११,९३,४६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपींनी सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उत्पादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने वाहतूक केली आहे. **आरोपी** यांचेविरूद्ध पोस्टे नरखेड येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये ०२ गुन्हे नोंद केले आहे.



## एमआयडीसी बोरी पोलीस स्टेशन हद्दीतील ०२ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्पार

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हद्द्तीतील सराईत आरोपी १) राकेश शांताराम वारे, रा. टेंभरी, त. हिंगणा जि. नागपूर २) अजमत जुबेर खान, वय २७ वर्षे, रा. वटेघाट, त. हिंगणा, जि. नागपूर यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये हद्दपार करण्यात आले आहे.**

**वर नमुद सराईत गुन्हेगार क्र १ याचेवर दुखापत करने, बेकायदेशीर दारूविक्री तसेच गुन्हेगार क्र. २ याचेवर दुखापत करने, आर्म्स एक्ट यासारखे गंभीर गुन्हे नोंद आहे.**

नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी

निरंतर सुरूच ठेवली. आरोपी अशा प्रकारचे गुन्हे करीत असल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती तसेच आरोपींच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव एआयडीसी बोरी पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपूर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, नागपूर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद गुन्हेगार क्र १ आणि २ यांना तिन महिन्याकरीता नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**




**राकेश शांताराम वारे**



**अजमत जुबेर खान**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात सावनेर उपविभागांतर्गत राबविण्यात आले वाहतूक नियम जनजागृती अभियान

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण जिल्हयातील सावनेर उपविभांगांतर्गत उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर उपविभाग श्री. सागर खर्डे यांचे उपस्थितीत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत दिनांक १९/०९/२०२६ रोजी वाहतूक नियम जनजागृती दरम्यान विविध शाळांना भेट देवुन विद्यार्थी, शिक्षक व इतर मंडळींना वाहतूक नियमांचे माहिती देवुन वाहतूक नियमांबाबत जनजागृती करण्यात आली.**

पोलीस स्टेशन सावनेर:— श्री सागर खर्डे, सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांच्या उपस्थितीत पोलीस निरीक्षक श्रीमती ऋतुजा जाधव, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन सावनेर यांच्यासह पोलीस स्टेशन सावनेरच्या वतीने वाहतूक नियमांचे पालन, रस्ते सुरक्षा आणि अपघात प्रतिबंधाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने दिनांक १९/०९/२०२६ रोजी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात

आले. सावनेर येथील जवाहरलाल नेहरू हायस्कूल, सावनेर येथील विद्यार्थ्यांनी या रॅलीमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी हेल्मेट वापरा, अपघात टाळा, सीट बेल्टचा वापर करा, रॉंग साईडने वाहन चालवू नका तसेच वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत विविध जनजागृतीपर घोषणा देत नागरिकांना सुरक्षित वाहतुकीचा संदेश दिला. या रॅलीमध्ये सावनेर पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार तसेच जवाहरलाल नेहरू हायस्कूल, सावनेर येथील ४ शिक्षक आणि सुमारे १५० विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी झाले होते.

**पोलीस स्टेशन केळवद** :— श्री सागर खर्डे, उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांच्या उपस्थितीत सहा. पोलीस निरीक्षक श्री आशिष ठाकुर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन केळवद यांच्यासह वाहतूक नियमांबाबत नागरिकांमध्ये तसेच विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने पोलीस स्टेशन केळवद यांच्या वतीने 'वाहतूक जागरूकता सप्ताह' विविध उपक्रमांच्या माध्यमातून राबविण्यात आला. या अभियानांतर्गत केळवद पोलीस स्टेशनच्या पुढाकाराने दोन शाळांमधील सुमारे ४०० विद्यार्थ्यांचा सहभाग असलेली जनजागृती रॅली' आयोजित करण्यात आली. रॅलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी वाहतूक नियमांचे पालन, हेल्मेटचा वापर, वाहन चालविताना सुरक्षिततेची काळजी तसेच रस्त्यावर शिस्त पाळण्याबाबत जनजागृती केली. तसेच एकूण पाच शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांना वाहतूक नियम, रस्ता सुरक्षा, सुरक्षित वाहनचालकाची जबाबदारी आणि वाहतुकीदरम्यान घ्यावयाच्या खबरदारीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. वाहतूक नियमांविषयी विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशील पद्धतीने जागरूकता निर्माण करण्यासाठी दोन शाळांमध्ये वाहतूक विषयावर निबंध व पोस्टर स्पर्धांचे आयोजन' करण्यात आले. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून वाहतूक शिस्त व रस्ता सुरक्षेबाबत विविध संदेश प्रभावीपणे मांडले.वाहतूक जागरूकता सप्ताहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांचे महत्त्व रुजविण्यासोबतच सुरक्षित व शिस्तबद्ध वाहतुकीबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न केळवद पोलिसांकडून करण्यात आला.

**पोलीस स्टेशन मोहपा** :— पोलीस निरीक्षक श्री ईश्वर हनवते, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मोहपा यांच्यासह वाहतूक नियमांबाबत नागरिकांमध्ये तसेच विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने पोलीस स्टेशन मोहपा यांच्या वतीने 'वाहतूक जागरूकता सप्ताह' विविध उपक्रमांच्या माध्यमातून राबविण्यात आला. या अभियानांतर्गत मोहपा पोलीस स्टेशनच्या पुढाकाराने ०३ शाळांमधील सुमारे ४०० विद्यार्थ्यांचा सहभाग असलेली जनजागृती रॅली' आयोजित करण्यात आली. रॅलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी वाहतूक नियमांचे पालन, हेल्मेटचा वापर, वाहन चालविताना सुरक्षिततेची काळजी तसेच रस्त्यावर शिस्त पाळण्याबाबत जनजागृती केली. तसेच एकूण तिन शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांना वाहतूक नियम, रस्ता सुरक्षा, सुरक्षित वाहनचालकाची जबाबदारी आणि वाहतुकीदरम्यान घ्यावयाच्या खबरदारीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. वाहतूक नियमांविषयी विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशील पद्धतीने जागरूकता निर्माण करण्यासाठी शाळांमध्ये पोस्टर किंवा चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली तसेच प्रथम,

द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून वाहतूक शिस्त व रस्ता सुरक्षेबाबत विविध संदेश प्रभावीपणे मांडले.वाहतूक जागरूकता सप्ताहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांचे महत्त्व रुजविण्यासोबतच सुरक्षित व शिस्तबद्ध वाहतुकीबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न केळवद पोलिसांकडून करण्यात आला.












# अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :–** दिनांक १८/०९/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या इसमविरूद्ध कळमेश्वर पोलीसांनी कारवाई केली.

आरोपी नामे कमलेश उर्फे छोटु दिलीप पंधराम, वय २१ वर्ष, रा. इंदिरा नगर झोपडपटटी वार्ड क्र १२, कळमेश्वर हा पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीत बुधवार बाजार ब्राम्हणी जवळ कळमेश्वर येथे स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी संशयास्पदरीत्या फिरतांना मिळुन आला. सदर इसमास त्यांचे नाव व गाव विचारले असता त्यांनी उडवा उडवीचे उत्तरे दिली. नमुद आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ०६ गुन्हे दाखल, ९१६०/– रूपयाचा मुद्देमाल जप्त

**दिनांक १८/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, वाहतूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०६ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन मोहपा** येथे आरोपी नामे १)संजय अंबादास वरठे, वय ३१ वर्ष, रा. लोहगड, ता. कळमेश्वर २) प्रशांत वासुदेव वसु, वय ३५ वर्ष, रा. केळवद, ता. सावनेर ३) खंडु रेवतकर, रा. लोहगड, ता. कळमेश्वर यांचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे संदिप वसंता बहे, वय ३५ वर्षे, रा. सिर्सि ता. उमरेड, जि. नागपुर यांचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन कोंढाळी** अंतर्गत आरोपी नामे १) पंकज संभाजी डुमरे, वय ३५ वर्ष २) पंकज मारोती नेहारे, वय ३२ वर्ष 3) जोगेश मारोती खंडाते, वय ३० वर्ष, सर्व रा. आडेगांव ता हिंगणा, जि. नागपुर यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत** आरोपी नामे बंडु गोंडुजी टेकाम, वय ४६ वर्ष, रा. एरंडा याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत** आरोपी नामे सोमेश्वर दौलत वैदय, वय ६०वर्षे, रा. शिवनी भोंडकी, ता.रामटेक याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी अंतर्गत** आरोपी नामे रूपेश ठगन पहाडे, वय ३४ वर्ष, रा. माहुली, त. पारशिवनी, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद,

**नमुद कारवाईत एकुण १४३१० मिली देशी दारू, २८ लिटर मोहाफुल दारू असा एकुण ९१६०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## अवैध जुगार खेळणाऱ्या आरोपींवर गुन्हे दाखल
## २,७१,२४०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

**मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण जिल्ह्यात अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या तसेच जुगार खेळविणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कठोर कारवाई करून पोलीस स्टेशन वेलतूर, रामटेक हद्दीत अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या १५ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकूण ०३ गुन्हे दाखल करण्यात आले.**

**पोलीस स्टेशन वेलतूर** येथे ०६ आरोपीविरूद्ध ०१ गुन्हा, नमुद आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्याचे वर **०१ गुन्हा नोंद** करण्यात आला आहे. **पोलीस स्टेशन रामटेक** येथे ०३ आरोपीविरूद्ध ०१ गुन्हा आणि ०५ आरोपीविरूद्ध ०१ गुन्हा नमुद आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **२ गुन्हे नोंद** आहे.

**वर प्रमाणे १५ आरोपीविरूध्द महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ५२ ताशपत्ते व ०४ मोटरसायकल, नगदी एकुण २७१२४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यांवर
## एन.डी.पी.एस कायदयान्वये ०२ गुन्हे नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १८/०९/२०२६ रोजी पोलीस स्टेशन पारशिवनी येथे विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०२ आरोपी यांचेवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन पारशिवनी** अंतर्गत आरोपी १) राहुल कमल तौमर, वय २३ वर्ष, रा. शिवटेकडी, पारशिवनी

ता. पारशिवनी जिल्हा नागपुर २) रोहित अजित गायकवाड, वय २६ वर्ष, रा. शिवटेकडी, पारशिवनी ता. पारशिवनी हे वेगवेगळया ठिकाणी सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने त्यांचेविरूद्ध कलम २७ एनडीपीएस ॲक्ट अन्वये ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७१८ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १९/०९/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७१८ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :– नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३० आरोपी अशा एकुण ९२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :– उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४२ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २६ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २६ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १३२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :–** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४७ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३८ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १७ आरोपी अशा एकुण १५२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :– कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २१ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १९ आरोपी अशा एकुण ७५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २७ आरोपी अशा एकुण ११४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५२ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४७ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २७ आरोपी अशा एकुण १५३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.








जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर